अर्थ प्रशासन विभाग,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
कृषि नगर, अकोला – 444104 ( महाराष्ट्र )

जावक/क्रमांक/आस्था/ 2433 /२०१८ दिनांक :- १८.३.१८

प्रती,

सर्व आहरण व संवितरण अधिकारी/
विभाग प्रमुख,
डॉ.पंदे.कृ.वि,अकोला.

विषय:- आर्थिक वर्षाच्या अखेरीस खरेदी व देयक सादर करण्याबाबत

संदर्भ:- १.शासन परिपत्रक क्र.संकीर्ण२०१८/प्र.क्र.१७/२०१८/कोषा प्रशा-५दि.१४/०३/२०१८
२.शासन परिपत्रक क्र.संकीर्ण२०१८/प्र.क्र.५८/२०१८/कोषा प्रशा-५दि.१४/०३/२०१८
३.शासन परिपत्रक क्र.संकीर्ण२०१८/प्र.क्र.६१/२०१८/कोषा प्रशा-५दि.१४/०३/२०१८

वरील विषयाचे अनूषंगाने व संदर्भिय शासन परिपत्रकान्वये सर्व आहरण व संवितरण अधिकारी/विभाग प्रमुख,यांना सुचित करण्यात येते की,अनेक प्रस्ताव वित्तिय मंजूरी करीता नियंत्रक कार्यालयाकडे सादर केले जातात. सदर प्रस्ताव दि. २० मार्च नंतर प्राप्त झाल्यास सदर प्रस्तावास मान्यता देणे, तद्नंतर सदर विभागाकडून ,खरेदी करणे , खरेदीची देयके अधिदान व लेखा अधिकारी यांचे कडे सादर करणे तसेच सदर देयके पारीत करणे या कार्यपध्दतीसाठी पुरेसा अवधी मिळू शकत नाही. शेवटच्या क्षणी प्राप्त झालेल्या सर्व प्रस्तावाची छाननी वेळे अभावी विभागाकडून होवू शकत नाही. तसेच अधिदान व लेखा अधिकारी यांना सुध्दा सदर देयकाची छाननी करीता पूरेसा अवधी मिळू शकत नाही. सदर देयकाला छाननी करण्यास पूरेसा अवधी मिळावा याकरीता दि.२८ मार्च,२०१८ पर्यंत देयके अधिदान व लेखा अधिकारी यांचे कार्यालयाला सादर करावे. तसेच दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी सायंकाळी ६.०० नंतर देयके स्वीकारल्या जाणार नाहीत. तरी सर्व देयके दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी सायंकाळी ६.०० पूर्वी अधिदान लेखा अधिकारी यांचे कार्यालयाला सादर करावी.

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला.

Scanned by CamScanner